**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.**

क्रमांक : संगाबाअवि/८/सी-2765/२०२५,

दिनांक : 20 / ०९ /२०२५.

**जाहिरात**

**सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता नवीन (पारंपारिक- कला, वाणिज्य व विज्ञान फक्त) महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्राचे प्रस्ताव व विस्तारिकरणातंर्गत नवीन अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी चे 'नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली' (New College Permission System-NCPS) द्वारे अर्ज मागविण्याबाबत.**

सर्व सामान्यांच्या माहितीकरिता सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (३), (४) (क) नुसार सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता वरील प्रमाणे नवीन (पारंपारिक व विधी) महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्राचे प्रस्ताव व विस्तारिकरणातंर्गत नवीन अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी चे 'नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली' (New College Permission System-NCPS) द्वारे करण्याबाबतचे अर्ज संस्थांनी/महाविद्यालयांनी Online पध्दतीने **दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ रोजी किंवा त्यापुर्वी** विद्यापीठात सादर करावयाचे आहेत. त्यानंतर Offline आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

संस्था चालकांनी उपरोक्त अर्ज Online पध्दतीने भरावयाचे आहे. Online Portal मध्ये भरलेला परीपूर्ण अर्ज सर्व आवश्यक सहपत्रांसह साक्षांकित करुन २ प्रतीत विद्यापीठाकडे सादर करावेत. Online अर्ज भरण्यासंदर्भात सविस्तर माहिती विद्यापीठ वेबसाईट www.sgbau.ac.in वर News and Announcements मध्ये दिलेली आहे.

**टिप :-** Online अर्ज भरतांना अडचणी आल्यास मो. नं. ९४२२६२३३८१, ९४२१४६२६१६, ९७६४०३९७४०, ७९७२६७४५९५ वर संपर्क साधावा.

**कुलसचिव**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

क्रमांक : संगाबाअवि/८/सी- 2968 /२०२५.
दिनांक : 20 / ०९ /२०२५.

**सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता नवीन (पारंपारिक-कला, वाणिज्य व विज्ञान फक्त) महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्राचे प्रस्ताव व विस्तारिकरणातंर्गत नवीन अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी चे 'नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली' (New College Permission System-NCPS) द्वारे अर्ज मागविण्याबाबत....**

सर्व सामान्यांच्या माहितीकरिता सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ वरील प्रमाणे कलम १०९ (३) (क) व १०९ (४) (क) नुसार सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्राचे प्रस्ताव व विस्तारिकरणातंर्गत नवीन अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्याबाबतचे अर्ज संस्थांनी / महाविद्यालयांनी **दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली (New College Permission System-NCPS)** या ऑनलाईन प्रणालीची खालील लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. करीता ऑफलाईन प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाही.

**https://htedu.maharashtra.gov.in/NCPS/**

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता शासन निर्णय क्र.मान्यता-२०२५/ई-४८०७८३/मशि-४, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ नुसार वरीलप्रमाणे नवीन महाविद्यालय आणि शासन निर्णय क्र. एनजीसी-२०२५/ई-१३१९८७८/मशि-४, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ अन्वये विस्तारीकरणा अंतर्गत नवीन अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी ला मंजुरी देण्यासाठी 'नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली' (New College Permission System-NCPS) कार्यपध्दती विहीत केलेली आहे. प्राचार्य व संस्थाचालकांनी सदर शासन निर्णय काळजीपुर्वक वाचून नमूद केलेल्या अटींची पुर्तता करावी.

नवीन (पारंपारिक-कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय व विस्तारीकरणातंर्गत नवीन अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी चे अर्ज, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बृहत आराखडा स्थळ बिंदू, प्रस्तावासोबत आकारण्यात येणाऱ्या शुल्क **Online Portal** वर नमुद केलेले असुन विहीत शुल्काचा भरणा केल्यावरच सदर अर्ज **Online** सादर करता येईल.

'नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली' (New College Permission System-NCPS) मध्ये दर्शविलेल्या ठिकाणासाठीच नवीन (पारंपारिक) महाविद्यालय व विस्तारीकरणातंर्गत नवीन अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी इत्यादीबाबतचे अर्ज स्विकारल्या जातील, सोबत जोडलेल्या तक्त्यातील स्थळबिंदू निश्चित केलेल्या ठिकाणा शिवाय इतर ठिकाणी बिंदूकरीता केलेले अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत. संस्थाप्रमुख/प्राचार्यांनी **Online Portal** मध्ये नमूद ठिकाणी दर्शविलेल्या नवीन (पारंपारिक) महाविद्यालय व विस्तारीकरणातंर्गत नवीन अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी चे **Online** अर्ज सादर करतांना **Online Portal** मध्ये **Payment Gateway** मध्ये विकसीत करण्यात आलेली विहीत शुल्कासह सादर करावे. त्याव्यतिरिक्त अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

संस्था चालकांनी/महाविद्यालयानी नवीन (पारंपारिक) वरीलप्रमाणे महाविद्यालय व विस्तीरीकरणातंर्गत नवीन अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी चे अर्ज खालील टीप मध्ये नमुद केलेल्या प्रमाणे **Online** पध्दतीने भरावयाचे आहे. भरलेला परीपूर्ण **Online अर्जाच्या दोन प्रती व अर्जासोबत जोडलेल्या आवश्यक सहपत्रांसह साक्षांकित करुन विद्यापीठाकडे सादर करावेत**.

महाराष्ट्र शासनाने पत्र क्र. संकीर्ण-२०२५/ई-१३१७१५३/विशि-५, दिनांक १९.०९.२०२५ अन्वये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठासाठी बृहत आराखडा मंजुर केला असून, बृहत आराखड्यामध्ये नमुद स्थळ बिंदूच्या ठिकाणाकरीताच अर्ज स्विकारण्यात असल्याने **शासन निर्णयानुसार संस्थेने नवीन महाविद्यालय व विस्तारीकरणासाठी / महाविद्यालयाने द्यावयाचे सर्व हमीपत्र व सहपत्र आणि साक्षांकित प्रति संस्था अध्यक्ष /सचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने द्याव्यात.** त्यानुसारच पात्र अर्जाचा विचार केला जाईल.

संस्थेने/महाविद्यालयाने सादर केलेल्या अर्जामध्ये कोणत्याही प्रकारच्या तृटया आढळून आल्यास संबंधित संस्थेने/ महाविद्यालयाने सादर केलेला अर्ज शासनाकडे शिफारस न करता संबंधितांना परत पाठविण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता विस्तारिकरणातंर्गत नवीन अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीबाबत मान्यता प्राप्त विद्यापीठ बृहत आराखडा व Online अर्ज भरण्यासंदर्भात सविस्तर माहिती विद्यापीठ वेबसाईट www.sgbau.ac.in वर News and Announcements मध्ये दिलेली आहे. त्यानुसारच अर्ज सादर करण्यात यावे. त्याव्यतिरिक्त प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**

(Online अर्ज भरतांना अडचणी आल्यास मो. नं. ९४२२६२३३८१, ९४२१४६२६१६, ९७६४०३९७४०, ७९७२६७४५९५ वर संपर्क साधावा.)

कुलसचिव
संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ.

**टिपः-** विद्यापीठासाठी नवीन विधी महाविद्यालय सुरु करण्याकरीता स्थळबिंद देण्यात आला नाही. परंतु शासनाचे आदेशाप्रमाणे सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

शासनाने शासन पत्र क्र. **HTED-२९०१०/२७/८४०७८३/२०२४/MHT(HE-४)**, दिनांक १९ सप्टेंबर, २०२५ मध्ये पुढीलप्रमाणे नमुद आहे :-

"बार काउन्सिल ऑफ इंडियाने त्यांच्या दिनांक १३.०८.२०२५ रोजी च्या प्रेस रिलिजनुसार, पुढील ३ वर्ष नवीन विधी महाविद्यालयांना परवानगी देण्यात येऊ नये असा निर्णय घेण्यात आलेला आहे. सबब, विस्तारीकरणांतर्गत "विधी" संदर्भातील नवीन अभ्यासक्रम / विद्याशाखा / विषय / नवीन अतिरिक्त तुकडी या संदर्भातील प्रस्तावाबाबत केवळ बार काउन्सिल ऑफ इंडिया चे ना-हरकत (NOC) प्रमाणपत्र सादर करणाऱ्या संस्थांचे / महाविद्यालायांचे प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १०९ (४) (ग) नुसार स्विकारण्यात यावेत." असे नमुद असल्यामुळे सदर ना हरकत प्रमाणपत्र नसलेल्या संस्थेने / महाविद्यालयाने अर्ज सादर करु नये.

File-New College 2026-27